(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गिधाडा ,पैठण,बिडकीन,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गिधाडा ,पैठण,बिडकीन,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बाबासाहेब नवनाथ तांबे | | | 1. शंकरनगर बिडखेडा परिसर श्री बी , पैठण,बिडकीन,औरंगाबाद ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 31-05-2022मी खालील सही करणार बद्रीनाथ नामदेव बागर वय 38 वर्षे व्यवसाय -शेती रा.मु गिधाडा ता पैठण जि औरंगाबाद मो.क्र. 7385887402 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 11/04/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, औरंगाबाद येथे हजर येवुन पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांचे कक्षात दोन पंचा समक्ष लेखी तक्रार दिली होती ती पुढील प्रमाणे, मी वरील प्रमाणे असुन शेती व्यवसाय करुन माझ्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो माझे नावे गट 18 गिधाडा शिवार येथे पावणे दोन एक्कर शेती आहे. सदर शेतजमीनीवर महाराष्ट्र शासनचे महात्मा गांधी रोजगार हमी योजना अंतर्गत अनुदानित विहीर मंजुर झालेली आहे. अनुदानित मंजुर विहीर असल्याने खोदकामासाठी कामच्या टप्पेवारी नुसार शासनाकडून रक्कम अदा करण्यात येते. त्याकरिता विहीर खोदकामाचे ग्रामपंचायतीतील रोजगार सेवक पाहाणी करुन हजेरी मस्टर तयार करुन स्वाक्षरी करतो, त्यानंतर हजेरी मस्टरवर ग्रामसेवक व सरपंच स्वाक्षरी करतात. त्यानंतर ग्रामसेवक सदरचे हजेरी मस्टर हे गटविकास अधिकारी यांचेकडे मंजुरी करिता पाठविण्यात येते. गटविकास अधिकारी यांनी हजेरी मस्टर मंजुर केल्यानंतर विहीर खोदकामाचे रक्कम रोजगार हमी योजनेच्या नमुद केलेल्या खातेदाराचे खात्यात जमा केली जाते.माझ्या शेतातील विहीरीचे तिन टप्पातील काम पुर्ण झाले असुन त्याकरिताची वर नमुद प्रक्रियेव्दरे मला रक्कम मिळालेली आहे. सध्या माझ्या शेतातील विहीरीचे चौथ्या टप्याचे खोदकाम सुरु आहे. त्या करिता शासनाच्या अनुदानीत रक्कमेची अवश्यकता असल्याने मी आठ दिवसापुर्वी आमचे गिधाडा गावाची ग्रुप-ग्रामपंचायत अलीयाबाद येथील ग्रामसेवक श्री.तांबे साहेब यांच्याकडे माझ्या विहीरीच्या कामाचे हजेरी मस्टरवर सही देवुन सदरचे हजेरी मस्टर गटविकास अधिकारी यांचेकडे सादर करण्याची विनंती केली तेव्हा ग्रामसेवक श्री तांबे हे मला म्हणाले की मी तुमच्या विहीर खोदकामाचे हजेरी मस्टरवर सही करुन तुमच्या अनुदानीत रक्कम तुम्हाला प्राप्त करुन देण्यास मदत करतो परंतु त्यासाठी तुम्हाला मला दहा हजार दयावे लागतील तेव्हाच मी सही करेल ग्रामसेवक श्री तांबे याना लाच देण्याची माझी इच्छा नाही. परंतु नाइलाजाने मी त्याना हो म्हणुन आलो आहे. आज दिनांक 11/04/2022 रोजी ग्रामसेवक श्री तांबे यानी मला माझ्या कामाकरिता भेटण्यासाठी गिधाडा गावात जिल्हा परिषद प्राथमिक शाळे समोर बोलावले आहे त्यामुळे मी ग्रामसेवक तांबे याना भेटण्यासाठी जाणार आहे त्यावेळी माझे विहीर खोदकामाचे हजेरी मस्टरवर सही करुन अनुदानीत रक्कम मिळावी या करिता विनंती करणार आहे त्यावेळी ग्रामसेवक श्री तांबे यानी माझ्याकडे लाचेची मागणी करुन स्वता किंवा इतरा मार्फत लाच रक्कम स्विकारल्यास त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाइ करण्यात यावी. माझा व ग्रामसेवक श्री तांबे यांचा उसनवारीची किंवा देण्याघेण्याचा अर्थिक व्यवहार नाही तसेच आमच्यामध्ये वैर किंवा दुष्मनी नाही. तरी श्री.तांबे यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी ही विनंती आहे. अशी तक्रार दिली आहे. माझे तक्रारीचे अनुषंगाने पो.नि श्रीमती सौदागर यांनी बोलविलेले शासकीय पंच क्र.1 श्री.गजानन को.खंदारे, कनिष्ठ सहाय्यक, कृषी विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद व पंच क्र.2 श्री. मोहम्मद आकिब जावीद एकबाल, महसुल शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद अशी पंचाची व माझी ओळख व परिचय करुन दिला. मी दिलेल्या तक्रारीवर पंचानी व पोलीस निरिक्षक श्रीमती रेशमा सौदागर यानी व मी स्वाक्षऱ्या

केलेल्या आहे.मी तक्रार दिले नंतर माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने पो.नि.श्रीमती रेशमा सौदागर यांनी पंच व सर्वानुमते ग्रामसेवक श्री.तांबे यांची गिधाडा ता.पैठण जि.औरंगाबाद येथे जावुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मी, पो.नि. श्रीमती रेशमा सौदागर, सापळा पथक व शासकिय पंच असे सापळाकामी लागणारे साहित्यासह शासकीय वाहनाने गिधाडा ता.पैठण जि.औरंगाबाद येथे जाण्यासाठी रवाना झालो. गिधाडा गावाचे अलीकडे सुरक्षीत ठिकाणी पोहचलो. सदर सुरक्षीत ठिकाणी पो.नि. सौदागर यांनी योग्य सुचना दिल्या त्यानंतर माझ्याकडे व्हईस रेकर्डर चालु करुन पंच क्र. 1 श्री. खंदारे यांना सोबत घेवुन 14.00 वाजता रवाना झालो. आम्ही गिधाडा गावातिल जिल्हा परिषद प्राथमीक शाळा, समोरील रोडवर ग्रामसेवक श्री.तांबे यांना भेटलो. भेटी दरम्याण आमच्यामध्ये कामासंबंधाने बोलणे झाले. त्यावेळी महात्मा गांधी रोजगार हमी योजना अंतर्गत मंजुर विहीरीचे चौथ्या टप्पातील खोदकाम करण्यासाठी माझ्या विहीरीच्या खोदकामाचे हजेरी मस्टरवर सही करण्यासाठी म्हणुन ग्रामसेवक श्री. तांबे यांनी पंचसाक्षीदारा समक्ष दोन्ही हाताचे दहा बोटे वर करुन इशारा केला त्यावर मी म्हणालो दहा का? त्यावर ग्रामसेवक श्री.तांबे म्हणाले हो देवुन टाका असे म्हणुन माझ्याकडे 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन ते स्विकारण्याचे मान्य केले आहे. त्यानंतर मी व पंच असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 14.19 वाजता परत आलो. त्यानंतर पो.नी. श्रीमती रेशमा सौदागर यांचे सुचनेनुसार मी श्री.तांबे, ग्रामसेवक यांना फोनवर संपर्क केला असता ग्रामसेवक श्री. तांबे यांचा संपर्क होवु शकला नाही. त्यावर मी माहिती घेतली असता ग्रामसेवक हे गावातुन निघून गेल्याचे समजले. त्यावरुन ग्रामसेवक श्री.तांबे यांचा तक्रारदार यांचेशी संपर्क झाल्यानंतर पुढील कारवाई करण्याचे पो.नी. श्रीमती सौदागर व शासकिय पंच असे सर्वानुमते ठरले.त्यानंतर श्री. तांबे ग्रामसेवक यांना मी, वेळोवेळी संपर्क केला परंतु त्यांनी माझा फोन रिसिव्ह केला नाही. श्री. तांबे ग्रामसेवक यांना माझ्यावर काहीतरी संशय आला आसावा त्यामुळे ते आता माझ्याकडून दिनांक 11/04/2022 रोजी मागणी केलेली 10,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारतील असे मला वाटत नाही. तसा दिनांक 30/05/2022 रोजी मी ऍ◌ण्टी करप्शन कार्यालयात पो.नि श्रीमती सौदागर सविस्तर जबाब दिला आहे. तरी ग्रामसेवक श्री.तांबे यांनी दिनांक 11/04/2022 रोजी 14.00 ते 14.19 वाजेदरम्याण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,गिधाडा ता.पैठण जि.औरंगाबाद येथे माझ्या विहीरीच्या खोदकामाचे हजेरी मस्टरवर सही करण्यासाठी म्हणुन पंच साक्षीदारा समक्ष 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले आहे. म्हणुन माझी त्यांचेविरुद्ध कायदेशिर फिर्याद आहे. समक्ष हि फिर्याद दिली सही.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Santosh Dayanand Mane(I (Inspector)) / API **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची
**Name** (नाव): Santosh Dayanand Mane
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): API

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)